निशाणी ०१ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदार यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४५७ अन्वये गुन्हयात खाली नमूद असलेला जप्त मुददेमाल परत मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

| जप्त वाहनाचे वर्णन | |
|---|---|
| वाहन नंबर | MH02-EH1677 |
| चेसीस नंबर | MA3FSEB1S00537631 |
| इंजिन नंबर. | D13A5307383 |
| मॉडेल | MARUTI DZIRE LD! |
| कंपनी | MARUTI SUZUKI INDIA LTD. |

वर नमूद वाहन हे एरंडोल पोलिस स्टेशनमधील गुन्हा रजिस्टर नंबर १८६/२०२२ भादवि कलम ३०४अ,२७९ तसेच मो.वा.का.क.१८४,१३४ब अन्वये दाखल गुन्हयात जप्त करण्यात आलेला आहे. अर्जदाराच्या अर्जानुसार सदरचे वाहन हे त्यास वापराकरिता हवा असून सदरचे वाहन पोलिस ठाण्यात पडून राहिल्यास अर्जदाराचे नुकसान होणार आहे.

२. एरंडोल पोलिस स्टेशन यांचेवतीने तपास अधिकारी यांनी निशाणी ६ कडे म्हणणे दाखल केले. त्यांनी त्यांचे म्हणण्यात कथन केले आहे की, वर नमूद वाहन हे सदर गुन्हयात जप्त करण्यात आले असून तो अर्जदार यांना देण्यास हरकत नाही.

३. अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी म्हणणे दाखल केले. त्यांनी त्यांचे म्हणण्यात कथन केले आहे की, वर नमूद वाहन हे सदर गुन्हयात जप्त करण्यात आले असून ते अर्जदार यांचे मालकीचे आहे. जप्त वाहन परत करणेस हरकत नसल्याचे तपासअधिकारी यांचे म्हणणे वरुन दिसुन येते. सदर वाहनाची तपासकामी आवश्यकता यापुढे दिसुन येते. म्हणुन उपरोक्त क्रमाकांचे वाहन अर्जदार यांना योग्य त्या अटी व शर्ती व योग्य त्या रकमेचा सुपूर्दनाम्यावर परत करणेस हरकत नाही.

४. अर्जदाराच्या वतीने विधिज्ञ श्री. के.जी.भाटीया यांचा युक्तीवाद ऐकला. त्यांचे न्यायालयास सांगणे की, सदरचे वाहन हे अर्जदार यांच्या मालकीचे आहे. सदर वाहन पोलिस ठाण्यात पडून राहिल्यास खराब होउ शकते अर्जदार याच्या उदरनिर्वाहासाठी सदर वाहन त्यास हवे आहे. मा. न्यायालय आदेश करेल त्या त्या वेळी सदरचे वाहन हजर ठेवण्याची अर्जदार हमी देत आहे.

५. अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी युक्तीवाद केला की, वर नमूद वाहन हे सदर गुन्हयात जप्त करण्यात आले आहे. वाहनाची तांत्रीक तपासणी करण्यात आली असुन जप्त वाहन अर्जदार यांना योग्य त्या अटी व शर्ती अन्वये देण्यास आमची काहीएक हरकत नाही.

६. अर्ज, त्यासोबत जोडलेले दस्तऐवज, म्हणणे तसेच युक्तीवाद विचारात घेतला. प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदार यांनी गुन्हयातील जप्त वाहन परत मिळण्याकरिता दाखल केलेला

आहे. सदरच्या वाहनावर अर्जदार यांनीच दावा केलेला आहे. प्रस्तुत गुन्हयाची संपरिक्षा ही या न्यायालयासमक्ष चालविली जाणार आहे. सदरचे वाहन पोलिस ठाण्यात जप्त ठेवण्याचे कोणतेही न्यायोचित कारण दिसून येत नाही. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४५७ प्रमाणे सदर वाहनाचा ताबा अर्जदारास तात्पुरत्या स्वरुपात देण्यात येत आहे. संपरीक्षेदरम्यान सदरचे वाहन या न्यायालयात हजर करण्याचे आदेश हे न्यायालय देउ शकते. प्रथमदर्शनी सदरचे वाहन अर्जदार यांचे मालकीचे असल्याचे दिसून येत असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे -

आदेश

| | |
|---|---|
| १ | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| २ | जप्त वाहन हस्तांतर, विक्री न करण्याच्या रक्कम रु.०३ लाख रुपयांच्या हमीचे बंधपत्र रु. २००/– च्या स्टॅम्पपेपरवर लिहून दिल्यानंतर अर्जदार यांच्या ताब्यात देण्यात यावा. |
| ३ | मा. न्यायालयाच्या परवानगीशिवाय अर्जदार यांनी जप्त वाहनामध्ये कोणताही फेरबदल करु नये, त्याचा रंग बदलू नये, त्याचे स्वरुप बदलू नये. |
| ४ | मा. न्यायालय आदेश करेल त्या वेळी अर्जदार यांनी सदरचे वाहन मा. न्यायालयात हजर करावयाचा आहे. |
| ५ | अर्जदार यांनी स्वखर्चाने वाहनाच्या चारही बाजूचे फोटो काढून ते तपास अधिकारी यांना दयावयाचे आहे. |
| ६ | वरील सर्व अटींची पुर्तता केल्यानंतर जप्त वाहन तपास अधिकारी यांनी अर्जदार यास योग्य तो पंचनामा करुन परत दयावे. |
| ७ | संबंधित पोलिस स्टेशन यांना पत्र पाठवावे. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by DHONDAGE VISHAL SHRAVAN
Date: 2022.11.19 15:57:44 +0530

दिनांक -१९/११/२०२२ (विशाल श्रावण धोंडगे )
ठिकाण – एरंडोल प्रथमवर्ग न्यायदंडधिकारी, एरंडोल